दिव्य मराठी बीड जिल्हा 03-02-2024

# 'बीडचे संमेलन हे विभागीय न राहता मुख्य संमेलनच बनले'

संजय पाटील देवळाणकर,
कार्यवाह, अ.भा.नाट्य परिषद बीड शाखा



'विभागीय नाट्य संमेलन हे नाट्य संमेलन न राहता ते मुख्य संमेलन झाले. काल साडेपाच हजार रसिक प्रेक्षक पारसनगरी येथील कै.सुहासिनी इर्लेकर रंगमचावर लोटले होते. आजच्या सकाळच्या दिंडीला बीड शहरातील विद्यार्थी कलावंत वेशभुषेत होते. या संमेलनासाठी रंगभुमीवर काम करणारे दीडशे कलांवत बीडमध्ये आले होते. त्याच बरोबर बीड जिल्ह्यातील कलेचे प्रतिनिधीत्व पहायला मिळाले.'

बीड येथे झालेल्या विभागीय नाट्य संमेलनाच्या उदघाटन सोहळ्यात दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे व विलासराव देशमुख यांची पुन्हा एकदा आठवण झाली. कारण मंत्री उदय सामंत आणि धंनजय मुंडे यांच्या भाषणातील लकब दोन्ही नेत्यासारखी दिसुन आली. दुपारी महाराष्ट्राची लोकधारा असलेल्या मराठी पाऊल पडते पुढेचा जल्लोष झाला. ओवी ते भैरवी असा अविष्कार पहायला मिळुन महाराष्ट्राच्या पारंपारीक लोककलेचे दर्शन घडले. त्यांनतर बीडचे भुमिपुत्र असलेले अभिनेते संदीप पाठक यांच्या वऱ्हाड निघालय लंडनला या एकपात्री नाटकातुन पुन्हा एकदा दिवंगत जेष्ठ नाटककार लक्ष्मणराव देशपांडे यांच्या आठवणी जागल्या. येता उश संगीत नाटकाची परंपरे नुसार नाट्यगीत आणि प्रवेश सादर केले. त्यातील वेगळेपण असे की, संगीत नाटकाची परंपरा दर्शवणारे वातावरण होते. गणेश चंदनशीवे, सचित पाटील, गौरी कुलकर्णी यांनी कलवंताशी गप्पा नाटकातील नाटक यामध्ये सहभाग घेतला. नाट्यसंमेलनाला रसिक प्रेक्षक स्वत:हून आला होता. बाहेरून आलेल्या कलावंतासाठी राहण्याची भोजनाची व्यवस्था केली होती. ८९ वे संमेलन झाल्या त्याच्या आठवणी जागल्या. एक संमेलन होऊन संपू नये म्हणून पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, खानदेश व पश्चिम महाराष्ट्र व कोकण, अशा पाच ठिकाणी होत आहेत. समारोप रत्नागिरीत होणार आहे. दिपा क्षीरसागर आणि डॉ. योगेश क्षीरसागर यांनी मुंबईच्या शाखेकडे मागणी करत हे संमेलन बीड येथे घेत अल्पावधीत यशस्वीही केले.

- ( शब्दांकन : दिनेश लिंबेकर)

## कलावंतांचा सन्मान मोलाचा

बीडचे संमेलन स्थानिक कलांवत जिल्ह्याचे कलांवत यांना बरोबर घेऊन संमेलन यशस्वी केले आहे. बीड जिल्ह्याचे नाव लौकिक करणाऱ्या कलावंताचा सन्मान या ठिकाणी करण्यात आला सन्मानपत्र देण्यात आले. ही खऱ्या अर्थाने या कलावंतांच्या आजवरच्या कार्याची पावती होती. सर्व कलावंतांनी संमेलनात पूर्ण वेळ हजर राहत समाधान व्यक्त केले, याचा आनंद वाटतो.